# पोलीस आयुक्तालय नवी मुंबई

## प्रेस नोट

दि. १७/११/२०२१

**विशेष शाखा, नवी मुंबई** **@ परदेशी नागरिकांच्या नोंदणी संदर्भात @**

भारतामध्ये (नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत : नवी मुंबई म.न.पा., पनवेल म.न.पा., उरण न.पा., उरण तालुका व पनवेल तालुका कार्यक्षेत्रात) विदेशी नागरिक विविध कारणास्तव भेट देत असतात किंवा वास्तव्यास असतात. विदेशी नागरीकांच्या पासपोर्ट व व्हिसाची वैधता तपासणे, आगमन व निर्गमन नोंदी ठेवणे, व्हिसा मुदतीच्या कालावधीत ते भारतातून परत जातात की नाही? तसेच त्यांच्या हालचालींवर लक्ष ठेवणे, त्यांचा भारतात येण्याचा हेतू काय आहे? याबाबतची माहिती देशाच्या सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून अद्ययावत ठेवणे अत्यंत गरजेचे आहे. विदेशी व्यक्ती नोंदणी अधिनियम १९३९, विदेशी व्यक्ती अधिनियम १९४६, विदेशी व्यक्ती नोंदणी नियम १९९२ मधील तरतूदींनुसार हॉटेल/हॉस्पीटल/गेस्ट हाऊस/धर्मशाळा/शैक्षणिक संस्था/अन्य आस्थापना किंवा घर/फ्लॅट किंवा गृहनिर्माण सोसायटीमध्ये वास्तव्यास येणाऱ्या विदेशी नागरिकांना ऑनलाईन सी फॉर्म भरून विदेशी नागरिक नोंदणी अधिकारी, विशेष शाखा, सेक्टर १०, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई यांच्याकडे नोंदणी करणे बंधनकारक आहे.

मागील काही वर्षापासून बहुसंख्य बांग्लादेशी आणि आफ्रिकन देशाचे नागरीक, विशेषत: नायजेरीयन, केनीयन, युगांडन नागरीक यांचे पासपोर्ट व व्हिसा बनावट आहेत किंवा त्यांच्या पासपोर्ट व व्हिसाची मुदत संपलेली आहे किंवा सी फॉर्म न भरता व परदेशी नागरिक नोंदणी कार्यालयाकडे नोंदणी न करता नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत खाजगी फ्लॅट किंवा गृहनिर्माण सोसायटीमध्ये भाड्याने राहत आहेत. तसेच अनेक फ्लॅट किंवा गृहनिर्माण सोसायटीमध्ये बांग्लादेशी नागरिक (महिला व पुरूष) यांच्याकडे भारतात राहण्याची कायदेशीर परवानगी असलेला वैध पासपोर्ट व व्हिसा नसतानाही त्यांना हाऊस किपींग, सिक्युरिटी गार्ड इ. साठी कामावर ठेवले जाते. सदरची बाब अत्यंत गंभीर असून तो कायद्याने गुन्हा आहे. त्यामुळे घर/फ्लॅट मालक/गृहनिर्माण सोसायटी व्यवस्थापक/पदाधिकारी/भाडे एजंट यांनी खालीलप्रमाणे नियमांचे काटेकोरपणे पालन करावे.

१) सर्वप्रथम विदेशी नागरिकाचा पासपोर्ट व व्हिसा खरा किंवा बनावट आहे? मुदतीत आहे किंवा नाही? याची खात्री करण्यासाठी घर/फ्लॅट मालक किंवा गृहनिर्माण सोसायटीचे पदाधिकारी किंवा भाडे एजंट यांनी त्यांचे पासपोर्ट, व्हिसा व इतर कागदपत्रे तपासणीकरीता विदेशी नागरिक नोंदणी अधिकारी, विशेष शाखा, नवी मुंबई यांचेशी तात्काळ संपर्क साधावा. विदेशी नागरिकाचे पासपोर्ट किंवा व्हिसा हे वैध असेल तरच त्यांना वास्तव्यास ठेवावे.

२) विदेशी नागरीक यांनी स्वत: किंवा त्यांना राहण्यास ठेवणाऱ्या व्यक्तींनी www.indianfrro.gov.in/frro/FormC या संकेतस्थळावरून ऑनलाईन सी फॉर्म भरून नोंदणी करणे बंधनकारक आहे.

३) ज्यावेळी विदेशी नागरीक हे एखाद्या ठिकाणी वास्तव्यास येतात, त्यावेळी विदेशी नागरीकांच्या आगमना (Arrival) पासून २४ तासांच्या आत त्यांची अचूक माहिती ऑनलाईन सी फॉर्मव्दारे भरणे व परदेशी नागरिक नोंदणी कार्यालय, पोलीस आयुक्त कार्यालय परिसर, सेक्टर १०, बेलापूर, नवी मुंबई यांना लेखी कळविणे बंधनकारक आहे.

४) ज्यावेळी वास्तव्यास असलेले विदेशी नागरीक निर्गमन (Departure) करतात, त्यावेळी निर्गमन दिनांक व वेळ, तसेच ते पुढे कोठे जाणार आहेत? याबाबतची नोंद ऑनलाईन सी फॉर्म प्रणालीत करणे व परदेशी नागरिक नोंदणी कार्यालय, पोलीस आयुक्त कार्यालय परिसर, सेक्टर १०, बेलापूर, नवी मुंबई यांना लेखी कळविणे बंधनकारक आहे.

५) विदेशी नागरीक नोंदणी अधिकारी किंवा दंडाधिकारी किंवा पोलीस हवालदार किंवा त्यापेक्षा वरच्या दर्जाचे पोलीस अधिकारी ज्यावेळी विदेशी नागरिकांचे वास्तव्य असलेल्या ठिकाणांची तपासणीकरीता येतील. त्यावेळी आपल्याकडे वास्तव्यास असलेल्या विदेशी नागरीकांची माहिती विचारल्यास किंवा अधिकृत सी फॉर्मची मागणी केल्यास सी फॉर्मची प्रत, व्हिसा व पासपोर्ट आणि अन्य वैध कागदपत्रे उपलब्ध करणे बंधनकारक आहे.

तरी नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीतील घर/फ्लॅट मालक, गृहनिर्माण सोसायटीचे पदाधिकारी, भाडे एजंट यांनी विदेशी नागरीकांना वास्तव्यास ठेवताना विदेशी व्यक्ती नोंदणी अधिनियम १९३९, विदेशी व्यक्ती अधिनियम १९४६, विदेशी व्यक्ती नोंदणी नियम १९९२ मधील वर नमूद तरतूदींचे पालन करणे बंधनकारक आहे. नमूद तरतूदींचे उल्लंघन केल्यास आपल्याविरूध्द विदेशी व्यक्ती नोंदणी अधिनियम १९३९ कलम ५ आणि विदेशी व्यक्ती अधिनियम १९४६ कलम १४ आणि भारतीय दंड संहिता कलम १८८ अन्वये कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

..........................................................................................

**पोलीस उप आयुक्त तथा परदेशी नागरिक नोंदणी अधिकारी,**
**विशेष शाखा, नवी मुंबई.**